# कापूरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ३५० /२०२५ दि. ३१/०७/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी, कापूरबावडी** वाहतूक उप विभागाचे हद्दीत कॉनवुड इनक्लेव्ह रियालीटी प्रा.लि यांचे कडुन वसंत विहार सर्कलकडून हनुमान मंदिर सर्कलकडे येणारे वाहिनीवर कॉनवुड इनक्लेव्ह सोसायटी समोरील रस्त्यावर मोबाईल क्रेन उभी करून कॉनवुड इनक्लेव्ह या बिल्डींगवर मोबाईल क्रेन चढविण्यात येणार आहे. त्याकरीता कॉनवुड इनक्लेव्ह सोसायटी समोरील रोडवर वसंत विहार कडून पोखरण रोड नं २ कडे येणारी वाहिनी पुर्णवेळ वाहतुकीसाठी पुर्णपणे बंद करावी लागणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | वसंत विहार सर्कल कडून हनुमान मंदिर समोरून पोखरण रोड नं २ कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **वसंत विहार सर्कल येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही वसंत विहार सर्कल येथुन डावे बाजुस वळण घेवून सरळ जावुन डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही वसंत विहार सर्कल येथुन उजवे बाजुस वळण घेवून सिध्दाचंल मार्गे इच्छित स्थळी जातील. |

सदर अधिसूचना दि. ०२/०८/२०२५ रोजी सायंकाळी १९: ०० वा ते दिनांक ०५/०८/२०२५ रोजी सकाळी ०८:०० वा रोजी पर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u>** :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**<u>प्रत</u>** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**<u>प्रत</u>** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उप विभाग
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.